अण्णा भाऊ साठे यांचे कथा वाङ्मय

डॉ. माधव बसवंते

प्रास्ताविक :-

अण्णा भाऊ साठे यांनी समतेचा पुरस्कार करीत अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, विषमता, साम्राज्यवाद यासारख्या अनेक अमानवीय प्रवृत्तीवर हल्ले करीत निरंतरपणे विज्ञानाची पूजा केली. कादंबरीकार, कथाकार, नाटककार, लोकशाहीर अशा अनेक अंगांनी अण्णा भाऊ साठे यांची ओळख असली तरी त्यांची अंगभूत प्रतिभा ही कथालेखकाची होती. इ.स. १९४९ पासून ते इ.स. १९६९ पर्यंत अण्णा भांऊनी अनेक उच्च दर्जाच्या कथा लिहिल्या. सामाजिक परिवर्तनासाठी केवळ बौद्धिक युक्तिवाद पुरेसे नसतात, तर त्यासाठी लोकांच्या भावनिक जीवनाशी नाते जोडावे लागते हा परिवर्तनाचा विचार अण्णा भाऊंनी आपल्या कथाविश्वातून दिला आहे. म्हणूनच त्यांच्या कथांचे विषय हे कमालीचे धगधगते व वेदनांनी भारावलेले आहेत. अण्णा भाऊंच्या कथा वाङ्मयातील विनोद वाचकाला विषण्ण करणारा आहे. त्यांनी जवळपास साधारणतः अडीचशे ते तीनशे कथांचे लेखन केले असून या सर्व कथा एकूण वीस कथासंग्रहात एकत्रित करण्यात आल्या आहेत. अण्णा भाऊंची कथा ही मराठी वाचकांपुरती मर्यादित न राहता, ती जवळपास चौदा भारतीय भाषा व परकीय भाषेमध्ये भाषांतरित झाली आहे. शोषक आणि शोषितांमधील संघर्ष हाच अण्णा भाऊंच्या कथा वाङ्मयाचा प्रमुख केंद्रबिंदू आहे. बंडखोरपणा, विद्रोह आणि सामाजिक परिवर्तनाचा ध्यास हा अण्णा भाऊंच्या कथा वाङ्मयातील नायक-नायिकांचा स्थायीभाव आहे. अण्णा भाऊंनी आपल्या कथाविश्वातून मराठी साहित्याला नव्या जगाची ओळख करून देत मराठी कथेचे दालन अधिक समृद्ध केले.



बीजसंज्ञा : अण्णा भाऊंचे कथा वाङ्मय, आत्मचरित्रात्मक कथा, दलित संघर्षमय कथा, गुन्हेगारी जीवनदर्शन कथा, प्रेमकथा.

प्रस्तावना

अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या समग्र साहित्यातून अखेरपर्यंत माणसांचा शोध घेतला आणि माणसांना कोणत्याही परिस्थितीत जगण्याचा संदेश दिला. त्यांच्या हृदयात माणूस, माणुसकी आणि न्यायाचा आविष्कार होता. अण्णा भाऊंची खरी प्रकृती ही कथा वाङ्मय व शाहिरी बाण्याची होती. तरीही त्यांनी वाङ्मयाच्या इतर लेखन क्षेत्रात अभूतपूर्व योगदान दिले आहे. त्यांच्या साहित्यातून माणसांच्या हृदयाचा व त्यांच्या भवितव्याचा आविष्कार झाल्याचे दिसून येते. 'माणसाइतका दुसरा सृजनात्मा पाहिला नाही' असाच अण्णा भाऊंचा दावा आहे. म्हणून 'माणूस वाढला पाहिजे आणि मोठा झाला पाहिजे' ही अण्णा भाऊंची मानवतावादी दृष्टी आहे. त्यांच्या कथेतील नायक नायिका समाज वास्तव स्पष्ट करीत राजकीय व सामाजिक तत्त्वज्ञानही सांगतात.

अण्णा भाऊ साठे यांनी अगदी प्रारंभीच्या काळात पोवाडे गायिले. प्रारंभी गॉर्कीच्या अनुवादित अनेक कथा वाचून त्यांना कथा लेखनाची प्रेरणा मिळाली, त्यानंतर अण्णा भाऊ कथा लेखनाकडे वळले. अण्णा भाऊंच्या कथांचे लघुकथा व दीर्घकथा अशा स्वरुपाच्या भेद वा वर्गीकरण करणे अवघड आहे. त्यांची कथा ही प्रामुख्याने विषय, आशय आणि अनुभव समृद्धतेने भिन्न असल्याचे स्पष्टपणे जाणवते. म्हणूनच आकृतीबंधाच्या दृष्टीने अण्णा भाऊंची कथा ही नियममुक्त आहे, असे म्हणावे लागेल. तसेच अण्णा भाऊंची कथा ही मार्क्सवादी असली, तरी ती प्रचारात्मक मात्र अजिबात नाही.

अण्णा भाऊंचे कथा वाङ्मय

इ.स. १९४९ ते इ.स. १९६९ या कालखंडात अण्णा भाऊ साठे यांनी कथालेखन केले आहे. त्यांची 'माझी दिवाळी' ही पहिली कथा इ.स. १९४९ मध्ये 'मशाल' या साप्ताहिकात प्रकाशित झाली असली, तरी पुढे इ.स. १९५६ पर्यंत त्यांचा एकही कथासंग्रह प्रकाशित झाला नसल्याचे दिसून येते. अण्णा भाऊ साठे यांच्या प्रकाशित कथा वाङ्मयात खुळंवाडी, बरबाद्या कंजारी, कृष्णाकाठच्या कथा, आबी, भानामती,

लाडी, फरारी, गजाआड, चिरागनगरची भुतं, गुऱ्हाळ, जिवंत काडतूस, ठासलेल्या बंदुका, नवती, निखारा, भुताचा मळा, रानवेली, राम-रावण युद्ध, भोमक्या या कथासंग्रहांचा यात समावेश आहे. अण्णा भाऊंच्या कथासंग्रहाची संख्या आणि प्रकाशन वर्ष याविषयी अभ्यासकामध्ये संभ्रम निर्माण होताना दिसून येतो. अण्णा भाऊंच्या कथा वाङ्मयाची अभ्यास व संशोधनाच्या दृष्टिने संशोधक व अभ्यासकांनी पुढील पाच विभागात विभागणी केली आहे. त्यात १) दलित संघर्षमय कथा, २) कलात्मक कथा, ३) आत्मचरित्रात्मक कथा, ४) गुन्हेगार जीवनदर्शक कथा, ५) प्रेमकथा. याप्रमाणे कथेचा आशय व विषयानुसार ही विभागणी करण्यात आली आहे.

अण्णा भाऊ साठे यांचे कथाविश्व हे क्रांतिकारकांचे समाज जीवन आहे. त्यात परिवर्तनाचा निर्धार आहे. जग बदलण्याचा आणि क्रांतीचा उद्गार आहे. 'जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांची कथा आहे' अशा शब्दात आचार्य प्र.के. अत्रे यांनी अण्णा भाऊंच्या कथेचे समीक्षण केले. म्हणून संघर्ष हाच अण्णा भाऊंच्या कथेचा प्राण व श्वास आहे.

दलित संघर्षमय कथा

'कोण कुणाचा धनी नाही, सर्वांच्याच भोवती आक्रोश आहे. परंतु माझे स्पष्ट मत आहे की, तुम्ही जगलंच पाहिजे. जसं जमेल तसं जगा. काहीही करा आणि जगा. तुम्ही कुत्र्यासारखं मरु नका. हेही दिवस जातील.' असा हा 'खुळंवाडी' मधील संघर्ष आहे. याच कथासंग्रहातील 'बंडवाला' या कथेत अन्याया विरुद्ध झुंज देणाऱ्या एका क्रांतिकारी मांगाचे चित्रण आहे. 'कोंबडी चोर' मधील गांधीवादी पुढारी आणि रामाचा संवाद विचार प्रवर्तक आहे. 'बरबाद्या कंजारी' मधील बहुतेक सर्व कथा लढाऊ व व्यक्तिचित्रणात्मक आहेत. यातील 'सुलतान' ही कथा मार्क्सवादी आहे. 'स्मशानातील सोनं' ही कथा अंगावर शहारे आणणारी असून कमालीचा जीवनानुभव या कथेतून साकार झाला आहे. 'उपकाराची फेड' मध्ये हीन दर्जाच्या जातियतेचे दर्शन होते. 'आबी' व 'निखारा' मध्ये झुंजार तरुणीचे दर्शन होते. तर 'राम-रावण युद्ध' यात ग्रामीण भागातील संघर्षाचे विनोदी चित्रण आहे.

आत्मचरित्रात्मक कथा

अण्णा भाऊंचे कथाविश्व हे अनेक माणसांच्या समूहाभोवती फिरतांना जाणवते. त्यांच्या कथा वाङ्मयातील माणसं त्यांना कुठेतरी भेटलेली असतात. कथेतील परिसर त्यांनी पाहिलेला आहे. अनुभवलेला आहे. 'जिवंत काडतुस' मधील नसरु हा अण्णा भाऊंचा बालमित्र आहे. तर 'शिकार' कथेतील गंगाराम हा त्यांचा मित्र आहे. अण्णा भाऊंना जीवन जगत असतांना अनेक मित्र व माणसं भेटली, त्यांचे चित्रण त्यांनी आपल्या साहित्यात केले आहे. ज्याला एक बायको सांभाळता येत नाही, पण तो दोन बायका करतो, अशा हरिबाचे चित्रण कथेत आले आहे. अण्णा भाऊंनी गुन्हेगारी समूहाचेही आपल्या कथेत चित्रण केले आहे. अण्णा भाऊंनी अनेक प्रेमकथाही लिहिल्या आहेत. त्याबरोबरच अण्णा भाऊ साठे यांनी अंधश्रद्धाविरुद्धच्या कथांमधून वाचकांना वैज्ञानिक नवदृष्टी दिली आहे. 'मरीआईचा गाडा' आणि 'कृष्णाकाठच्या कथा' यातील कथांमधून अण्णांनी शास्त्रीय विचारधारा स्पष्ट केलेली आहे. समाजातील अर्थहीन रुढी परंपरा चालू ठेवणे हे मूर्खपणाचे आहे हे 'नाना' या पात्राच्या माध्यमातून समाजाला त्यांनी संदेश दिला आहे. सामाजिक न्यायावर आधारलेली अण्णा भाऊंची जीवनसृष्टी आहे. इतिहासाकडून त्यांना द्रष्टेपण प्राप्त झाले आहे. म्हणूनच अण्णा भाऊ साठे मराठी कथाविश्वाला शौर्यगाथा देणारे कंठमणी ठरले आहेत, हे विधान अतिशयोक्तीचे वाटू नये.

गुन्हेगारी जीवनदर्शन कथा

'खुळंवाडी' मधील 'मेंढा' यात लखू माने या व्यक्तिरेखाचे चित्रण आहे. अनेक स्त्रियांवर बलात्कार करणाऱ्याचे चित्रण 'गजाआड' मधील 'तरस' या कथेत आले आहे. यातील तरशा हा जन्मतःच खेकड्यासारखा दिसणाऱ्या विकृत प्रवृत्तीचे व्यक्तिचित्रण रेखाटण्यात आले आहे. पुरुष गुन्हेगारी चित्रणाबरोबरच अण्णांनी स्त्री गुन्हेगारी चित्रणही केले आहे. 'हौशी' या कथेतील हौशी ही लख्या या आपल्या प्रियकरासाठी आपल्या पतीचा खून करते. त्यामुळे तिला शिक्षा होते. शिक्षा संपल्यानंतर ती तुरुंगातून सुटते आणि लख्याला विसरुन राजा नावाच्या तरुणाबरोबर पळून जाते. 'आबी' मधील 'आडवा आक्या' या कथेतील आक्या हा नायक आहे. तो व त्याचे तीन प्राणी कुत्रा, गाय व बैल हे गावास उपद्रवी व त्रासदायक असतात. शेवटी सारा गाव वैतागून आक्याला व त्यांच्या तिन्ही प्राण्यांना धडा शिकविला जातो. 'गुऱ्हाळ' मधील 'हिकमत' या कथेतून लोकांना नकली सोने देऊन ग्रामीण भागातील अज्ञानी लोकांची कशी फसवणूक केली जाते याचे चित्रण करण्यात आले आहे. याच संग्रहातील 'हेड्या हैबती' यात हैबती या हेड्याचे चित्रण आहे. गुरांच्या बाजारातील हेड्या हा दलाल असून तो गुरे विक्रेता व ग्राहक या दोघांकडूनही दलाली घेत असतो. वहाणं तो एका फडक्यात बांधून या वहाणांच्या जोडावर हात ठेऊन खोटी शपथ घेत असतो, परंतु बोलतांना मात्र 'भाकरीवर हात ठेऊन शपथ घेतोय' असे सांगत असतो. आपल्या व्यवसायासाठी खोटे बोलणाऱ्या व्यक्तिचे यात वास्तव चित्रण आहे. 'कृष्णाकाठच्या कथा' यातील 'इरेनं गाढव खाल्लं' यात गर्व असलेल्या तुका नावाच्या व्यक्तिचे चित्रण आहे. तो स्वतः असुशिक्षित असून त्याच्या सुशिक्षित पत्नीमुळे त्याला न्यूनगंड वाटत असतो. आपले न्यूनगंड लपविण्यासाठी तो आपल्या पत्नीला सतत मारहाण करीत असल्यामुळे त्याची सुशिक्षित पत्नी त्याला कायमची सोडून निघून जाते. एकंदरीत अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या अनेक कथांमधून गुन्हेगारी जग जसेच्या तसे जिवंत केल्याचे वाचकाला पदोपदी जाणवते.

प्रेमकथा

अण्णा भाऊ साठे यांच्या प्रेमकथांना वर्गीयदृष्टी आहे. 'वेडा वारा' या कथेतील गंगू ही विवाहानंतर नांदायला जाते. गंगूला सासरी करावी लागणारी अनेक कष्टाची कामे आणि नवरा-बायकोची होणारी किरकोळ भांडणे, यामुळे आपल्या मुलीला सासरी त्रास आहे असे समजून गंगूचे वडील तिला माहेरी आणतात. परंतू गंगू मात्र ही अचानक सासरी निघून जाते. आपल्या मुलीला पळवूनच नेले अशी समजूत करुन घेऊन गंगूचे वडील तिच्या सासरी जाऊन गंगूला परत माहेराला नेण्याचा आग्रह धरतात. मात्र पतीच्या प्रेमासाठी व्याकूळ झालेली गंगू ही स्वत: माहेरी जाण्यास स्पष्ट नकार देते. 'राणी' या कथेत भाऊ पैलवान, मारुती रामोशी व राणी असा हा प्रेमाचा त्रिकोण चित्रित झाला आहे. तमासगीरच्या जीवनातील 'तमाशा' या कथेत बापू आणि त्याच्या दोन प्रेयसी गोजा व नवतक यांच्या आदर्श प्रीतीजीवनाचे सुरेख वर्णन आहे. गोजा व नवतक या दोघींही एकमेकींचा द्वेष न करता बापूच्या लौकिक यशासाठी आपल्या प्रियकराचा त्याग करण्यासाठी तयार होतात. 'रंभा' या कथेत रंभा या सुंदर तरुणीचे व तमाशात नर्तकीचे काम करणाऱ्या मीरा या देखण्या नाच्याची सुंदर प्रेमकथा असून रंभा ही घर व आपल्या आईवडिलांना सोडून मीरासोबत निघून जाते. 'मंजुळा' मधील मंजुळा ही शूर असून आपल्या प्रियकरांसाठी आपल्या वडिलांवर व नातेवाईकांवरही कुऱ्हाडीने वार करण्यास मागेपुढे पाहत नाही. 'पिला' यातील कोळी समाजातील पिला तरुणी व उत्तम नावाच्या कुंभारातील प्रेमकथा आहे. शिवा आणि त्याची बायको येसू यांच्यातील 'फरारी' ही प्रेमकथा असून तशीच ती शौर्यकथाही आहे.

एकंदरीत अण्णा भाऊ साठे यांचे कथाविश्व हे न्यायाच्या सिंहासनावर आधारलेली एक आदर्श जीवनदृष्टी आहे. त्यांच्या कथांमधील नायक-नायिकांना अन्याय, अत्याचाराविषयी प्रचंड चीड असून दुसरीकडे मात्र त्यांना मानवी मूल्याबद्दल प्रचंड प्रेम आहे. अण्णांचे कथाविश्व विद्रोही व परिवर्तननिष्ठ असून सामाजिक समता निर्माण करणारे आहे. तसेच त्यांची कथा ही शोषित आणि वंचिताची जीवनगाथाच ठरली आहे. समाजातील अन्याय अत्याचाराविरुद्ध आग ओकणारी व विषमतेविरुद्ध लढणाऱ्या नायक नायिकांचे दर्शन अण्णांच्या कथांमधून होते. अस्पृश्यतेची चिरंतर आग अण्णांच्या मस्तकात भिनल्यामुळे त्यांनी आपल्या कथाविश्वातून मूल्यांचा निरंतर आक्रोश व उद्घोष केला. जातीमुळे माणसाचे माणूसपणच नाकारले जात आहे, म्हणून त्यांनी जाती संपविण्याचा कठोर निर्धार केला होता. एक सत्यशोधक व एक देशभक्त म्हणून अण्णा भाऊ साठे यांचे व्यक्तिमत्व त्यांच्या समग्र वाङ्मयातून स्पष्टपणे प्रतिबिंबीत होते.

अण्णा भाऊ साठे यांची समग्र कथा ही व्यक्तिचित्रणात्मक, विनोदात्मक, अद्भुत रंजनात्मक, ग्रामीण कलात्मक यासारख्या प्रकारांमध्ये मोडणारी असून त्यात चित्रमयतेचे दर्शन होते. अनेक गुणांनी व वैभवांनी समृद्ध असलेली अण्णांची ही आत्ममुक्तीचा उद्घोष करणारी आहे. श्रमधारा आणि रक्तधारा ही त्यांच्या साहित्याची धारा आहे. मनोरंजनाकडून प्रबोधानाकडे ही त्यांच्या साहित्याची दिशा आहे. माणसांना सन्मानित करणारे त्यांचे हे साहित्य आहे. अण्णा भाऊंचे साहित्य हे सामाजिक न्याय व समतेची दीक्षा देणारे आहे. त्यांच्या कथा वाङ्मयात सत्याचा प्रकाश आहे. अन्याय, अत्याचाराची प्रचंड चीड आहे. केवळ माणुस आणि माणुसकीसाठी लढणारी अण्णा भाऊंच्या कथेतील नायक-नायिका आहेत. म्हणूनच अण्णा भाऊंची लेखणी ही शोषित व श्रमिकांचा कैवार घेणारी आहे. त्याच्या मस्तकातील आणि लेखणीतील आग ही वर्गमुक्ती व वर्णमुक्तीची होती. माणुस आणि माणुसकी नाकारणाऱ्या या कठोर व्यवस्थेला उद्ध्वस्त करुन अण्णा भाऊंना मानवतावादी नवे जग निर्माण करावयाचे होते. हेच त्यांचे अंतिम स्वप्न होते.

निष्कर्ष

- अण्णा भाऊ साठे यांनी मराठी कथेचा पारंपरिक पांढरपेशीपणाचा मार्ग बदलून विषय, आशय आणि अनुभव समृद्धीने मराठी कथेचे दालन अधिक समृद्ध केले.
- माणूस कितीही बलदंड असला तरी दारिद्र्यामुळे तो किती टोकाचा संघर्ष करु शकतो हेही अण्णा भाऊंनी आपल्या कथेतून स्पष्ट केले आहे.
- 'कधी ना कधी मरण येणारच आहे, त्यामुळे माणसानं चांगल्या कामी करावं' ही राष्ट्रभक्तीची निर्णायक शिकवण आणि संदेश अण्णांच्या कथा विश्वातून मिळतो.
- मराठी कथेला अपरिचित असणाऱ्या नव्या जगाचा परिचय अण्णा भाऊंच्या कथांनी करुन दिला आहे.
- अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या कथाविश्वातून सामाजिक विषमतेवर निकराचा प्रहार करीत जग बदलण्यासाठी आणि परिवर्तनासाठी संघर्षाचा प्रभावी मार्ग दखविला.
- अण्णा भाऊंच्या कथेतील नायक नायिका बंडखोर आणि संघर्षमय जीवन जगणाऱ्या असून प्रसंगी जीव द्यायला आणि जीव घ्यायलाही त्या सदैव तयार असतात.
- अण्णा भाऊंच्या कथांमधील नायक-नायिकामध्ये नैतिक मूल्यांचे कमालीचे पाठबळ आहे.
- शौर्य, साहस, बलिदान, शूर, वीर, माणुसकी यासारख्या अनेक सर्वश्रेष्ठ गुणांनी अण्णा भाऊंनी दलित जीवनाला श्रीमंत करुन त्यांनी आपल्या कथांमधून दलितांच्या सामाजिक न्यायाचा आवाज अधिक उंच केला.
- आजचे राजकारण हे श्रीमंतांनी श्रीमंतासाठी चालविलेले राजकारण आहे आणि गरिबांचे नाव हे चरणीसारखे वापरतात हे राजकीय तत्त्वज्ञान त्यांनी आपल्या अनेक कथेतून व्यक्त केले आहे.

- अण्णांनी दलित संघर्षमय, कलात्मक, आत्मचरित्रात्मक, गुन्हेगारी जीवनदर्शन, प्रेम, कौटुंबिक जीवन, अंधश्रद्धा, दुःखांत यासारख्या अनेक विषयावरील कथा लेखन करुन त्यांनी वाचकांना वैज्ञानिक दृष्टीबरोबरच विवेकाची, चिंतनाची आणि परिवर्तनाची नवी मानवतेची सम्यक दिशा दिली आहे.

संदर्भ

१) कोरडे बजरंग, भारतीय साहित्याचे निर्माते अण्णा भाऊ साठे, साहित्य अकादमी, मुंबई, तिसरी आवृत्ती २००७.
२) गुरव बाबुराव, अण्णा भाऊ साठे समाजविचार आणि साहित्यविवेचन, लोकवाङ्मय गृह, मुंबई, पाचवी आवृत्ती - २०१४.
३) सकटे मच्छिंद्र, अण्णा भाऊ साठे एक सत्यशोधक, प्रज्ञा प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००५.
४) भोसले एस.एस., प्रातिनिधीक कथा अण्णा भाऊ साठे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, द्वितीयावृत्ती १९८५.
५) वानखेडे चंद्रकांत, अण्णा भाऊ साठे साहित्य दर्शन, संकेत प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती २००७.